ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment.

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूली धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख १० जानेवारी, १९५१ अंक २

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर
शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा,
श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)
पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) ‖ श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४२,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९२,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## भोर स्टेट बँक लि.

[स्थापना : १९४४]
मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.
शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब थ. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलुएल्. बी.
श्री. बा. ग. धंदुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी
पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठी लिहा.
रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.)
मॅनेजर.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

(शिड्यूल्ड बँक)
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१८,२६५ |
| खेळतें भांडवल | रु. ७१,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

दळणाच्या चक्क्या–टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडवा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधु, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## विविध माहिती

**पनामा कालवा**—पॅसिफिक आणि अॅटलांटिक ह्या महासागरांना जोडणारा सुप्रसिद्ध पनामा कालवा युद्ध सुरू झाल्यास त्यावर बॉंब टाकून नाश करतां येण्यासारखा आहे. अमेरिकेच्या प्रतिनिधिगृहाच्या कार्मिटीनें अशी सूचना केली आहे कीं ह्या कालव्याच्या ऐवजीं नायकाराग्वा या देशांतून नवा कालवा काढण्यांत यावा अथवा पहिल्या कालव्याच्या मार्गाजवळून जाणारा दुसरा खोदण्यांत यावा. पनामा कालवा आधुनिक प्रचंड बोटींची वहातूक करण्यास उपयोगी नाहीं, अशाही वार्ता आहेत.

**पेनिसिलीनचा कारखाना**—भारतांत पेनिसिलीनचा एक कारखाना काढण्याचें घाटतच आहे. आतां ह्या कारखान्याला मदत म्हणून वर्ल्ड ऑर्गनायझेशनतर्फे १० लाख डालर्स देऊं करण्यांत आले आहेत, असें समजतें. ही मदत भारतानें घेतली तर पेनिसिलीन व इतर सल्फा औषधें आशियांतील मुलांसाठी देण्याचें बंधन भारताला पत्करावें लागेल. वरील रक्कम कर्ज म्हणून मिळणार असून तेवढ्या किंमतीचीं औषधें भारतानें द्यावयाचीं आहेत.

**प्रतिष्ठित नागरिकांना जादा साखर**—पतियाळा व पूर्व पंजाब राज्यांतील गॅझेटेड सरकारी नोकरांना दर महिना जादा ५ शेर साखर मिळत असते. ह्या प्रतिष्ठित नागरिकांच्या यादींत आतां वकिलांचीं नांवेंहि घालण्यांत आलीं आहेत. त्यामुळें ह्या नव्या प्रतिष्ठितांनाही आतां जादा साखर मिळूं लागेल.

**रशियाचें धान्याचें उत्पादन**—रशियांत १९५० सालीं १२ कोटी, १६ लक्ष टन धान्य उत्पादन झालें असल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे. १९४० सालापेक्षा हें उत्पादन ४८ लक्ष टनांनीं अधिक आहे असें समजतें.

**चीनकडून तांदूळ मिळणार**—१९५१ च्या पहिल्या तीन महिन्यांत चीनला ३७,००० गासड्या ताग देऊन त्याच्या बदला ५०,००० टन तांदूळ घेण्याचा करार भारतीय सरकारनें चिनी सरकारशीं केला आहे. हिंदुस्थानांतील तुटीची परिस्थिति लक्षांत घेऊन भारतीय सरकार मिळेल तेथून अन्नधान्य आणण्याची खटपट करीत आहे.

**चड्यांचा टिकिटें गोळा करण्याचा नाद**—इंग्लंडच्या राजानें पोस्टाचीं २,१४,००० तिकिटें गोळा केलीं आहेत. ह्या निरनिराळ्या प्रकारच्या तिकिटांच्या फोटोंचें एक पुस्तक प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. ह्या पुस्तकाच्या विक्रीनें हौशी अमेरिकन लोकांचे १० लाख डॉलर्स ग्रेट ब्रिटनला मिळतील असा अंदाज आहे.

**चेकोस्लोव्हाकियाचें आर्थिक पंचांग**—चेकोस्लोव्हाकियाच्या सरकारनें ३६४ दिवसांचें नवीन पंचांग ठरविलें आहे. ह्या पंचांगांत वर्षांतील महिन्यांना १ ते १२ अनुक्रम देण्यांत आले आहेत. १९५१ साल ९१ दिवसांच्या चार भागांचें ठरविण्यांत आलें आहे. नवीन पंचांगामुळें उत्पादन व हिशेब ह्यांची चांगली सोय होईल असें म्हणतात. आर्थिक व्यवहार सोडून इतर बाबतींत पूर्वीचेंच पंचांग चालू रहाणार आहे.

**सुताची निर्यात थांबवा**—अ. भा. विणकर परिषदेचे अध्यक्ष प्रो. रंगा ह्यांनीं सुताची निर्यात करणें बंद करावें अशी सूचना भारत सरकारला केली आहे. मद्रास राज्यांत ४८,००० सुताच्या गासड्या तयार होतात; त्यापैकीं निदान ३०,००० गासड्या तरी विणकरांना देण्याबाबत मद्रास सरकारनें मध्यवर्ती सरकारवर दडपण आणावें असेंही त्यांनीं सुचविलें आहे.

**व्यंग चित्राची प्राचीन कला**—व्यंग चित्रें काढण्याची कला प्राचीन काळीं इजिप्तमधील लोकांना माहीत असावी असा तर्क एका ब्रिटिश शास्त्रज्ञानें केला आहे. ख्रिस्त शतकापूर्वीचें १६०० वर्षामागील एक देऊळ नुकतेंच सांपडलें आहे. ह्या देवळाच्या ११० स्तंभांवर इसिस ह्या इजिप्तच्या देवतेचीं चित्रें काढण्यांत आलीं आहेत. ह्या स्तंभासमोरून वेगानें चालणाऱ्या वाहनांतून गेल्यास त्या देवतेच्या हालचालींचा भास होतो.

**रेशनमध्यें खजुराचा समावेश**—उत्तर प्रदेशांतील खेड्यांत वाटण्यांत येणाऱ्या शिध्यांत इराकमधील खजुराचा समावेश करण्यांत येणार आहे असें समजतें. कमी प्रतीच्या धान्याच्या ऐवजीं एक छटाक खजूर देण्यांत येणार आहे. इराककडून १,२०० टन खजूर मिळूं शकेल असें भारतीय सरकारनें राज्य-सरकारांना नुकतेंच कळविलें आहे.

**जपान-भारत दर्यावरील वहातुक**—चालू महिन्यांत अगर फेब्रुआरी महिन्यांत जपानहून न्यूयॉर्क, बॅंकॉक, भारत आणि पाकिस्तान इत्यादि ठिकाणीं दर्यावरून वहातूक करण्यास जपानला परवानगी मिळेल असा अंदाज आहे. जपाननें इंटर नॅशनल फ्रेटेज फेडरेशनकडे चार समुद्रमार्गावर वहातूक करण्याची परवानगी मागितली आहे.

**विजेच्या उद्योगधंद्याचें राष्ट्रीयीकरण**—शस्त्रोत्पादनवाढीच्या योजना अथवा इतर राष्ट्रीयीकरणाच्या योजना ह्यांचा ब्रिटनच्या 'ब्रिटिश इलेक्ट्रिक इंडस्ट्री' चे राष्ट्रीयीकरणावर प्रतिकूल परिणाम झाला नाहीं, असें वरील कंपनीचे प्रमुख लॉर्ड सिट्रिन ह्यांनीं एका भाषणांत जाहीर केलें. बहुसंख्य विजेच्या कंपन्या नगरपालिकांच्या आणि सार्वजनिक मालकीच्या असल्यामुळें ह्या धंद्याबाबत त्रास पडला नाहीं.

**एक्सप्रेस डिलिव्हरीच्या टपालावरील पत्ता**—एक्सप्रेस डिलिव्हरीनें पाठविलेल्या टपालाचा बटवडा ह्यापुढें तार खात्याच्या कचेऱ्या अगर पोष्ट कचेऱ्यांच्या तार-विभागाकडून करण्यांत येणार आहे, म्हणून अशा पत्रावर संपूर्ण पत्ता लिहिण्यांत यावा अशा सूचना पोष्टखात्यातर्फे देण्यांत आल्या आहेत.

**गुजरात विद्यापीठासाठी देणग्या**—गुजरात विद्यापीठासाठी अहमदाबादमधील व्यापारी व गिरणीवाले ह्यांनीं नाताळांत ३० लक्ष रुपयांच्या देणग्या दिल्या असें समजतें.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

## १९४९ मधील विम्याचें काम

### सरकारी आढाव्यांतील आकडेवार माहिती

१९४९ सालांत भारतीय विमा संस्थांच्या आयुर्विम्याच्या व्यवसायांत सर्व बाजूंनीं वाढ दिसून आली. सालिना एकंदर ७·४७ कोटी रुपये हप्त्यांचें उत्पन्न असलेलीं १३५·३५ कोटी रुपये विमा-रकमेचीं ५,४४,००० विमापत्रें देण्यांत आलीं. म्हणजे विमापत्रें, विमा-रक्कम व हप्त्यांचें उत्पन्न यांमध्यें अनुक्रमें ५९,९००, १५·४५ कोटी रु. आणि ०·९६ कोटी रुपये वाढ झाली.

त्याच वर्षांत भारतांत काम करणाऱ्या परदेशी संस्थांनीं ०·७४ कोटी रुपये हप्त्यांचें उत्पन्न असलेलीं १२·२२ कोटी रुपये विमा रकमेचीं १८,००० विमापत्रें दिलीं. मागील वर्षाच्या आंकड्यांच्या मानानें पहातां त्यांच्या विमापत्रांची संख्या किंचित कमी, परंतु विमा रक्कम व हप्त्यांचें उत्पन्न यांमध्यें वाढ झाली आहे.

१९४५ व १९४६ हीं वर्षे सोडलीं तर गेल्या दशकांतील कोणत्याही वर्षापेक्षां १९४९ मधील नवीन काम अधिक असलें तरी दर वर्षी कसेंही करून अधिकाधिक काम मिळण्याच्या हांवेस विमा संस्थांनीं आळा घालावा असा इषारा नियंत्रक अधिकाऱ्यांनीं दिला आहे. ओढून ताणून मिळविलेलें काम, विमापत्रें रद्द होण्याचें मोठें प्रमाण आणि आर्थिक दृष्ट्या न परवडणारा खर्च या भारतीय आयुर्विमा संस्थांत अनुभवास येणाऱ्या बऱ्याच अनिष्ट गोष्टींना हीच प्रवृत्ति कारणीभूत आहे असें त्यांचें मत आहे.

आग व इतर सर्व साधारण विमा व्यवसाय करणाऱ्या विमा संस्थांचे हप्त्यांचें उत्पन्न वाढलें असलें तरी ही वाढ विशेषत: ' संकीर्ण ' विमा व्यवसाय करणाऱ्या संस्थांचे बाबतींत स्पष्टपणें दिसून येतें.

गेलीं बरींच वर्षे सर्वसाधारण विमा व्यवसाय करणाऱ्या भारतीय संस्थांचें काम हळुहळू वाढत असलें तरी तें असावें त्याहून अद्यापि कमीच आहे.

१९३८ च्या विमा कायद्याखालीं नोंदविलेल्या विमा संस्थांची संख्या ७ ऑक्टोबर १९५० रोजीं ३४१ होती. त्यापैकीं, २३५ भारतीय व बाकीच्या परदेशी होत्या. केवळ आयुर्विम्याचें काम करणाऱ्या १३५, आयुर्विमा व इतर प्रकारचें काम करणाऱ्या ५० आणि केवळ आयुर्विमेतर काम करणाऱ्या ५० विमा संस्था होत्या. परदेशी विमा संस्थांचे बाबतींत वरील आंकडे अनुक्रमें ५, १५ व ८६ होते.

१९४८ सालचें भारतीय व परदेशी विमा संस्थांच्या भारतांतील आयुर्विम्याच्या कामाचें एकंदर उत्पन्न अनुक्रमें ४१·१० कोटी रु. व ७.३७ कोटी रु. होतें. विमा रकमेची फेड यासारख्या गोष्टींमुळें एकंदर याव्या लागलेल्या व खर्चाच्या रकमांचे आंकडे भारतीय व परदेशी संस्थांचे बाबतींत अनुक्रमें २२.९७ कोटी व ६·६५ कोटी रुपये होतें; बाकी १८·१३ कोटी रुपये व ०·७२ कोटी रुपये या रकमा अनुक्रमें भारतीय व परदेशी संस्थांच्या आयुर्विमा निधींत झालेली वाढ दर्शवितात.

विमा कायद्याच्या २७ व्या नियमान्वयें आयुर्विमा संस्थांनीं गुंतविलेल्या पैशांची पहाणी करतां कायदेशीर रीत्या ५५ टक्केच पैसे सरकारी व सरकारमान्य कर्जरोख्यांत गुंतविण्याचें बंधन असतांही त्यांनीं प्रत्यक्षांत ८३ टक्के पैसे अशा कर्जरोख्यांत गुंतविलें असल्याचें ३१ डिसेंबर १९४९ रोजीं आढळून आलें.

आयुर्विमेतर विमा व्यवसाय करणाऱ्या भारतीय विमा संस्थांचें हप्त्याचें एकूण उत्पन्न १०·३८ कोटी रुपये होतें. त्यापैकीं ५·३७ कोटी आगीच्या, १·९४ कोटी सागरी आणि ३·०७ कोटी इतर संकीर्ण स्वरूपाच्या विमा व्यवसायाचें होतें. भारतीय आणि परदेशी विमा संस्थांचें एकूण हप्त्याच्या उत्पन्नाशीं फेड रकमेचें प्रमाण आगीच्या विम्याचे बाबतींत २९ टक्के, सागरी विम्याचे बाबतींत ४७ टक्के आणि इतर प्रकारच्या विम्याचे बाबतींत ३८ टक्के होतें. १९४८ सालीं हेच आंकडे अनुक्रमें ३२,५१ व ३६ होते.

विमा कायद्याखालीं प्रमाणपत्रें दिलेल्या प्रतिनिधींची संख्या १९३९ त १,८०,७३७ होती. यांपैकीं २६ टक्के स्त्रिया होत्या. विमा प्रतिनिधींच्या संख्येंत झपाट्यानें वाढ झाली आहे.

## कुलाबा जिल्हा सहकारी परिषद

कुलाबा जिल्हा सहकारी परिषदेचें अधिवेशन पनवेल येथें शुक्रवार व शनिवार ता. १२ व १३ जानेवारी १९५१ रोजीं जैन हॉलमध्यें भरविण्याचें निश्चित झालें आहे.

परिषदेचें उद्घाटन नामदार वैकुंठराय मेहता, मुंबई राज्याचे अर्थ व सहकारी मंत्री यांच्या हस्तें व्हावयाचें आहे.

परिषदेचें अध्यक्षस्थान मुंबई प्रांतिक सहकारी बँकेचे ऑन. मॅनेजिंग डायरेक्टर श्री. व्ही. पी. वर्दे यांनीं स्वीकारण्याचें कबूल केलें आहे.

स्वागत समितीतर्फे परिषदेच्या प्रतिनिधींची व पाहुण्यांची रहाण्याची व जेवण्याची व्यवस्था आवश्यक तो खर्च घेऊन आगाऊ कळविल्यास करण्यांत येईल.

तरी सर्व सहकारी संस्थांनीं व इतरांनीं परिषदेस अवश्य हजर रहावें व आपल्या सूचना व नांवें ता. १० जाने. १९५१ चे आंत इकडे कळवावींत अशी स्वागत समितीचे अध्यक्ष श्री. त्रिं. ना. बेडेकर, पनवेल ह्यांची विनंति आहे.

## शेड्यूल्ड बँकांविषयीं तुलनात्मक आकडे

( आकडे हजार रुपयांचे आहेत )

| | | २९-१२-१९५० | ३०-१२-१९४९ | २२-८-१९४७ |
|---|---|---|---|---|
| १. | डिमांड देणीं | ५९७,९३,७६ | ५८४,८४,५४ | ६२५,०२,७१ |
| २. | मुदती देणीं | २८४,२८,३९ | २६९,०४,३२ | ३०४,३३,३० |
| ३. | एकूण रोकड | ४०,७६,२७ | ३८,२५,२९ | ३६,०७,७७ |
| ४. | रिझर्व्ह बँकेंत ठेवलेली शिल्लक | ५३,८२,७७ | ७५,१७,६९ | ९६,७३,७२ |
| ५. | दिलेलीं कर्जे | ४३२,२७,२१ | ३९५,२४,६२ | ३५९,४५,६३ |
| ६. | डिस्कौंट केलेल्या हुंड्या | १२,८८,२५ | १५,१९,९८ | १५,१९,९८ |

## गेल्या १२ वर्षांत ब्रिटनच्या करपद्धतींत झालेला फरक

### स्वास्थ्य निर्माण कसें झालें ?

**( मा. म. का. )**

गेल्या १२ वर्षांत ब्रिटनच्या प्राप्तीवरील कराच्या बाबतींत झालेल्या फरकामुळें समाजजीवनाच्या दृष्टीनें कांहीं महत्त्वाच्या गोष्टी इंग्लंड रेव्हिन्यू रिपोर्टावरून लक्षांत येतात. करामध्यें वाढ अगदीं अलिकडे दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत झाली. सुमारें १०० वर्षांपूर्वीं निरनिराळ्या करांचें उत्पन्न ३० दशलक्ष पौंड होतें, तें १९०० च्या सुमारास ७८ दशलक्ष पौंड होऊन, १९४८-४९ सालीं २०५५ दशलक्ष पौण्ड इतकें प्रचंड झालें. अगदीं अलिकडच्या काळांत म्हणजे गेल्या दहा वर्षांत वैयक्तिक उत्पन्नाची परिस्थिति कशी बदलली आहे ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे. कारण या प्रकारच्या माहितीवरून सामान्य जनतेला सुखी करण्याच्या दृष्टीनें किंवा श्रीमंतांना कमी श्रीमंत बनवून गरिबांना जास्त श्रीमंत करण्याकडे सरकारी करयोजनेचा कसा परिणाम झाला आहे हें दिसून येतें. ब्रिटनमध्यें अधिकारारूढ असलेल्या मजूरपक्षाचें यश कोणत्या कारणामुळें शक्य झालें आहे याचाहि खुलासा निरनिराळ्या लोकांच्या प्राप्तीच्या आंकड्यांच्या अभ्यासावरून होऊं शकतो. ब्रिटनच्या कर-पद्धतीचें धोरण वाढत्या उत्पन्नावर वाढते कर बसविणें हें आहे. या दृष्टीनें पुढें दिलेली माहिती सूचक समजली पाहिजे.

१९३८-३९ सालीं वार्षिक दोन हजार पौण्डांवर उत्पन्न असणारांची संख्या १ लक्ष ५ हजार ३ शें होती ती १९४८-४९ सालीं ८५ हजार इतकी झाली. या आंकड्यांवरून देशांतील श्रीमंतांचें प्रमाण एकदम कमी झाल्याचें दिसून येतें. देशांत श्रीमंतीचें प्रमाण कमी होऊन प्राप्तीवरील कर भरणारांच्या कक्षेंत येणारांची संख्या मोठ्या प्रमाणांत वाढत आहे हें पुढील कोष्टकावरून आणखी स्पष्ट होईल.

| उत्पन्नाचें वार्षिक प्रमाण | १९३८-३९ मधील उत्पन्न असणारांचे आंकडे | १९४८-४९ मधील उत्पन्न असणारांचे आंकडे |
|---|---|---|
| २५०-५०० पौंड... | १,९४०,००० ... | ९,१५२,००० |
| ५००-१००० ,,... | ५०७,५०० ... | १,५५१,००० |
| १०००-२००० ,,... | १४२,२०० ... | ३४९,००० |
| २०००-४००० ,,... | ५४,६०० ... | ७९,६५० |
| ४०००-६००० ,,... | ११,६०० ... | ५,२६४ |
| ६००० वरील ,,... | ९,५६० ... | ८६ |

वर दिलेले आंकडे अतिशय उद्बोधक आहेत. अतिशय श्रीमंतांची संख्या १० वर्षांपूर्वी ६॥ हजार होती ती आतां फक्त ८६ झाली आहे. वार्षिक उत्पन्न ज्यांचें ४ हजार पौंडांपर्यंत आहे अशा गटांतील लोकांची संख्या मात्र गेल्या दहा वर्षांत पुष्कळच वाढली आहे. याचा सरळ अर्थ हा कीं गेल्या दहा वर्षांत सामान्य जनता व मध्यमवर्गांतले लोक यांचीं उत्पन्नें निश्चित प्रमाणांत वाढत आहेत व त्यांच्या राहणीचें मानहि बरेंचसें सुधारत आहे. परंतु ४ हजार पौंडांवर उत्पन्न असणारांची संख्या १८,१६० होती ती आतां दहा वर्षांत फक्त ५३५० इतकीच उरली आहे. ब्रिटनमध्यें गेल्या वर्षापासून उत्पादनाचें प्रमाण युद्धपूर्वीच्या काळापेक्षां बरेंच वाढलें आहे हें याचवेळीं लक्षांत घेतलें असतां असें स्पष्टपणें दिसून येतें कीं सामान्य जनतेला जास्त संपन्न करणें व अति श्रीमंतांना मध्यम पातळीकडे नेणें हा उद्देश कर पद्धतीनें साध्य केला आहे, व यामुळेंच देशांत स्वास्थ्य निर्माण झालें आहे.

## आग्नेय आशिआची बाजारपेठ

भारताचें एक व्यापारी शिष्टमंडळ आग्नेय आशिआंतील देशांना भेट देऊन नुकतेंच परत आलें. शिष्टमंडळानें आपला अहवाल सरकारला सादर केला आहे. निरनिराळ्या देशांतील बाजारपेठांची परिस्थिति निरीक्षण करण्याचा आणि भारतीय व्यापाराच्या वृद्धीची शक्यता अजमावण्याचा शिष्टमंडळाचा हेत होता. आपल्या पांच आठवड्यांच्या दौऱ्यांत भारताच्या प्रतिनिधींनीं, जकार्ता, सिंगापूर, कौलालंपूर, पेनांग, बँकॉक आणि रंगून इतक्या ठिकाणांना भेटी दिल्या.

आग्नेय आशिआंतील वरील देशांत भारतीय मालाला चांगली बाजारपेठ मिळूं शकेल असें मंडळाला आढळून आलें. कापड, तांब्याच्या वस्तू, लोखंड व पोलादाचा माल, सीमेंट, कागद, विजेचीं उपकरणीं व रसायनें इत्यादि विविध प्रकारच्या मालाला आग्नेय आशिआंत चांगली मागणी आहे. ह्या देशांना भारत वाढत्या प्रमाणांत कापड पुरवीत आहे त्यावरून कापडाच्या बाजारपेठेची चांगली कल्पना येते; परंतु भारताजवळच आज कापड अधिक प्रमाणांत निर्यात करण्याइतकें नाहीं. इंडोनेशिआला भारत जें कापड पाठवितो तें सिंगापूरमार्गें जातें. इंडोनेशिआशीं जो व्यापारी करार करण्यांत आला आहे, त्यांत प्रत्यक्ष त्याच देशाला कापड निर्यात करण्याची सोय करण्यांत आली आहे. सिंगापूर, मलाया, सयाम व ब्रह्मदेश ह्या देशांकडूनही भारतीय कापडाला चांगली मागणी येत आहे. भारतीय निर्यात व्यापाऱ्यांनीं ठिकठिकाणच्या बाजारपेठांच्या गरजा अभ्यासून त्या पुरविण्यासाठीं विशेष प्रयत्न केला पाहिजे असें अहवालांत सुचविण्यांत आलें आहे. मालाचें पॅकिंग व दर्जा ह्यासंबंधीं विशेष काळजी घेण्याकडेही लक्ष वेधण्यांत आलें आहे. आपण उत्पन्न करूं शकूं तो माल विकूं शकूं, हा भ्रम चुकीचा आहे. भारतांतील तयार होणाऱ्या हातमागाच्या कापडाला–विशेषतः लुंगीच्या कापडाला–आग्नेय आशिआंत फार मागणी आहे. ही मागणी फार पूर्वीपासून आहे. ब्रह्मदेश आणि मलाया ह्या देशांतील लोक हातमागाच्या कापडाच्या लुंग्या वापरतात. अलीकडे वरील दोन्ही देशांतून हातमागाचें कापड तयार होऊं लागलें आहे. तेव्हां भारतानें आपली बाजारपेठ टिकविण्यासाठीं मालाचा दर्जा चांगला राखला पाहिजे.

पण ह्या देशांकडे केवळ निर्यातीच्या बाजारपेठा म्हणूनच पहाण्याचें कारण नाहीं. भारतालाही ह्या देशांत होणाऱ्या कच्च्या मालाची गरज आहे. खोबरेल तेल, खोबरें, मसाल्याचे पदार्थ, टिन, लाकूड इत्यादि अनेक प्रकारचा माल भारताला आयात करतां येण्यासारखा आहे. हा कच्चा माल इंडोनेशिआकडून मिळविण्याची व्यवस्था उभय देशांच्या दरम्यान झालेल्या करारांत करण्यांत आली आहे. सारांश, भारत आणि आग्नेय आशिआंतील देश ह्या उभयतांचा परस्परांशीं व्यापार व्यवहार होण्यास पुष्कळ वाव आहे. आग्नेय आशिआच्या मानानें भारत औद्योगिक दृष्ट्या पुढारलेला आहे. अर्थातच कच्च्या मालाच्या बदला पक्का माल भारत पुरवूं शकेल. परंतु, ही बाजारपेठ टिकवून धरण्यासाठीं जपानसारख्या पुढारलेल्या देशांशीं स्पर्धा करावी लागेल हें विसरून चालणार नाहीं.

**गुळाचा भाव**—निरनिराळ्या ठिकाणीं गुळाच्या विक्रीचे जे कमाल भाव ठरवून देण्यांत आले आहेत, त्या मार्चांत मोसम संपल्यावरही वाढ करण्यांत येणार नाहीं, असें भारतीय सरकारनें जाहीर केलें आहे.

## कोळशाच्यां माहेरघरीं कोळशाचाच तुटवडा ?


ब्रिटिश सरकारवर परदेशांतून कोळसा आयात करण्याची पाळी आली आहे. ग्रेट ब्रिटनमधील वाढत्या औद्योगीकरणामुळें, निर्गत सुधारल्यामुळें आणि कामगारांची संख्या उतरल्यामुळें कोळसा जास्त लागूं लागला आहे. एका आठवड्याच्या उत्पादना-इतका कोळसा बाहेरून आणला म्हणजे ब्रिटनचें उत्पादन कायम राखतां येईल. थंडी कडाक्याची पडली, तर कोळशाच्या पुरवठ्याची परिस्थिति अधिकच बिकट होईल.

१९२६ सालीं ग्रेट ब्रिटनमध्यें मोठ्या प्रमाणावर संप झाले, तेव्हां प्रथम त्या देशानें बाहेरून कोळसा आणला. त्यानंतर १९४७ सालापर्यंत कोळसा आयात करण्याची गरज पडली नाहीं. त्या वर्षी कोळशाचा तुटवडा भासूं लागला, तेव्हां अमेरिकेकडून ६ लक्ष टन व पोलंडकडून २३ लक्ष टन कोळसा विकत घेण्यांत आला. त्याला ब्रिटिश कोळशापेक्षां जास्त किंमत पडली ती कोल बोर्डानें सोसली व देशी कोळशाच्या दरानेंच विदेशी कोळसा गिऱ्हाइकांना देण्यांत आला. अमेरिकन कोळशाच्या आयातीमुळें १४ लक्ष पौंड व पोलिश कोळशामुळें ८३ हजार पौंड भुर्दंड ग्रेट ब्रिटनला पडला. अमेरिकेकडून कोळसा मागवणें फारच महाग पडतें. तो जवळ जवळ दीडपट महाग पडतो. युरोपांतहि कोळशाचा तुटवडा भासत आहे, कारण पोलंड व ऱ्हूर येथील उत्पादन अद्याप अपेक्षेपेक्षां फारच कमी असून औद्योगिक मागणी मात्र वाढत आहे. सरकारनें कोळशाच्या खाणी राष्ट्रीय मालकीच्या केल्या, त्याचे दुष्परिणाम आतां भोगावे लागत आहेत अशी हुजूर पक्षाची टीका प्रस्तुत परि-स्थितीवर केली जात आहे. "बेकारी वाढली म्हणजे कोळसा खाणींत काम करण्यास पुरेसे कामगार आपोआपच येतात परंतु त्या परिस्थितीपेक्षां सध्यांची कामगारांना बेकार रहावें न लागण्याची परिस्थिति पुष्कळ बरी" असें त्या टीकेस मजूर सरकारचें उत्तर आहे.

ग्रेट ब्रिटनच्या गिरण्या व कारखाने ह्यांची आजवर भरभराट त्याच्या कोळशावरच झाली. परंतु १९५० सालाचें राष्ट्रीय माल-कीच्या कोळशाचें उत्पादन २०,५०,००,००० टनहि होऊं शकलें नाहीं. १९३७ मध्ये तें खाजगी मालकीखालीं व हुकमती-खालीं २४,००,००,००० टन झालें होतें. कोळशाच्या खाणींतील कामगार खाणींतील कामापेक्षां कारखान्यांतील काम जास्त पसंत करतात, इतकेंच नव्हे तर सैन्यांत दाखल होणें पत्करतात ! "कोळशानें उत्पन्न केलेली परिस्थिति हें लोकांच्या सुख-समृद्धीच्या भरमसाट मार्गे लागलेल्या राष्ट्राच्या दुखण्याचें चिन्ह आहे; आतां निदानांची आवश्यकता नाहीं, उपाययोजनाच हवी." असे उद्गार मँचेस्टर गार्डिअननें काढले आहेत. नॅशनल कोल बोर्डानें १,७७,८०,००,००० पौंड खर्चाची १५ वर्षांची योजना तयार केली आहे. २५० खाणींची पुनर्रचना, ७० नव्या खाणी खोदणें, ९० खाणी दुरुस्त करणें व ४०० खाणी बंद करणें आणि ८६,००० कमी कामगारांकरवीं उत्पादन ४,००,००,००० टनांनीं वाढवून टनामागें तें १ पौंड स्वस्त पाडणें अशी ती योजना आहे.

**राजाराणींचा नोकरांबरोबर नाच**—बकिंगहॅम राजवाड्यां-तील नाताळच्या सणाच्या नृत्यप्रसंगीं राणी एलिझाबेथ आणि सहावे जॉर्ज ह्यांनीं आपल्या नोकरांबरोबर नृत्य केलें. नृत्यासाठी राजवाड्यांतील एक मोठें दालन वापरण्याची परवानगी राजे-साहेबांनीं दिली होती.


रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्ही बदली करून देतों.

पेडणेकर आणि कं. लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.

तारेचा पत्ता:—PEDNECO, Bombay. फोन नं. २२७३८

पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटणारी

दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट मुंबई.

★ प्रमाणशीर खर्चांत मिळेल असें फक्त निवडक काम घेणें हें कंपनीचें ध्येय आहे, व यांतच विमे-दारांचें अंतिम हित आहे. ★

सर्वत्र प्रतिनिधि पाहिजेत.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर







दि माणिक सोप वर्क्स, कराड (साता

# मुंबई प्रांताची मधु-संचयांतील प्रगति

—एच्. विश्वनाथन्.
मधु-तज्ज्ञ, ग्रामोद्योग समिति, मुंबई प्रांत•

मुंबई प्रांतांत मधु संचय करणारे जिल्हे, त्यांतील प्रत्यक्ष काम करणाऱ्या गांवांची संख्या, मधुपालकांची संख्या, मधमाशांच्या वसाहतींची संख्या, मधाचें उत्पादन, इ. संबंधीं ३० जूनअखेर संपणाऱ्या १९४९–५० सालाची माहिती:--

| जिल्हा | प्रत्यक्ष काम करणाऱ्या गांवांची संख्या | मधुपालकांची संख्या | मध-वसाहतींची संख्या | मध उत्पादन (पौंड) |
|---|---|---|---|---|
| *उत्तर कानडा | २५९ | १३१४ | ३०२४ | ४१९२४ |
| सातारा (महाबळेश्वर) | ५१ | ३७८ | १००८ | ८०४० |
| बेळगांव ( नंदगड ) | ४० | १७३ | ४१० | २३०२ |
| कोल्हापूर (राधानगरी) | २४ | १३८ | १९७ | २१७४ |
| | ३७७ | २००३ | ५२३९ | ५४४४० |

*यापैकीं उत्तर कानडा जिल्ह्यांतील मध उत्पादनाचे आंकडे १–९–१९४९ ते ३०–६–१९५० पर्यंतचे असून इतर जिल्ह्यांतील १–७–१९४९ ते ३०–६–१९५० अखेरचे आहेत.

शिवाय असें समजतें कीं, आणखी ५०० वसाहती असून त्यांपैकीं ४०० वसाहती सातारा जिल्ह्यांतील महाबळेश्वर येथें ( मधु कोश सुमारें ३००, मधुसागर सुमारें १०० ) खाजगी कंपन्यांतर्फे व १०० वसाहती सुरत, रत्नागिरी, ठाणें, धारवाड इ. जिल्ह्यांत ठिकठिकाणीं विखुरलेल्या आहेत. या ५०० वसाहतींमधून सहजपणें अंदाजें एकूण उत्पादन ४,५०० पौंड होतें, असें मानतां येईल. ही वरील संख्या धरून मुंबई प्रांतांतील मधुवसाहतींची एकूण संख्या ५,७३९ व मध उत्पादन ५८,९४० पौंड होतें. मधुसंचय योजनेप्रमाणें नंदगड येथें १,५३० पौंड मध व १०६ पौंड मेण गोळा करण्यांत आलें. तसेंच बेळगांव जिल्ह्यांतील खानापूर तालुक्यांतून एका जंगल कंत्राटदारानें १५० डबे मध ( ६,००० पौंड ) व सुमारें ७०० पौंड मेण गोळा केलें. इतर जिल्ह्यांतील जंगली मध संचनाचे आंकडे अद्याप उपलब्ध नाहींत. तथापि, या सर्व इतर जिल्ह्यांतून ५० ते ६० हजार पौंड मध गोळा झाला असल्याची शक्यता आहे. या प्रांतांत आठ मधुपालकांच्या सहकारी सोसायट्या असून त्यांपैकीं उत्तर कानडामध्यें होनावर, कुम्टा, भतकल, अंकोला आणि कारवार येथें पांच असून, धारवाड जिल्ह्यामध्यें होनगळ येथें एक, कोल्हापूर जिल्ह्यांत राधानगरी येथें एक व बेळगांव जिल्ह्यांतील नंदगड येथें एक अशा आहेत. मधुपालकांपैकीं ९० टक्के शेतकरी आहेत.

इतर प्रांत–यांपैकीं मद्रासमध्यें १९४६ सालच्या मोजणींत आढळून आलें आहे कीं खाजगी तऱ्हेनें चालविल्या जाणाऱ्या मधमाशांच्या पोळ्यांची संख्या १०,००० असून या पोळ्यांमधून किती मधाचें उत्पन्न निघालें तें मात्र दिलेलें नाहीं. दक्षिण कानडा, म्हैसूर, कुर्ग, त्रावणकोर व कोचिन युनियन, उत्तर प्रदेश, पंजाब, आसाम, ओरिसा, मध्यप्रदेश इ. प्रांतांतूनहि मधुपालकांच्या मध व मेण उत्पादक सहकारी सोसायट्या बऱ्याच आहेत तसेंच हिंदमध्यें व अंकित संस्थानांच्या समूहांतून खाजगी तऱ्हेनें पाळलेली पोळ्यांची संख्या खूप आहे. मात्र याबाबतींत तपशीलवार माहिती आज उपलब्ध नाहीं.

( "सहयोग"–ऑक्टो. १९५० )


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.
( स्थापना १९१८ )

बचतीच्या विविध योजना
हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.
शाखा : दादर, माहीम, बेळगांव


## दि जमखिंडी स्टेट सें. को. बँक लि.

वसूल भांडवल १,४४,८६५ रु., रिझर्व्ह व इतर फंड १,२०,७६५ रु., एकूण खेळतें भांडवल २४,८६,००३ रु. असे वरील बँकेच्या भांडवल-ठेवीचे प्रमुख आंकडे आहेत. अहवालाचें वर्ष ११ महिन्यांचें असतांनाहि बँकेस निव्वळ नफा २८,४७६ रु. झाला आहे. कुंदगोळ शाखा गेल्या वार्षिक साधारण सभेंत ठरल्याप्रमाणें पुन: चालू करण्यांत आली होती आणि कर्नाटक सें. को. बँकेची शाखा तेथें निघतांच ती पुन: बंद करण्यांत आली. अहवालाचे वर्षी बँकेचें ऑफिस तिच्या स्वत:च्या इमारतींत २३–१–५० रोजीं नेण्यांत आलें. स्वत:चे इमारतींत बँकेची कचेरी आल्यामुळें बँकेची सर्व व्यवस्था अद्यावत् पद्धतीची करण्यास वाव मिळाला आहे. लवकरच सेफ डिपॉझिट व्हॉल्ट सुरू करण्याचा बँकेचा विचार आहे.

सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक म्हणून सादर करण्यांत येत असलेला हा अखेरचाच अहवाल आहे. मागल्या वार्षिक सर्व साधारण सभेंत यापुढेंही सदर बँक सें. को. बँक म्हणून रहावी असा ठराव करणेंत आला होता. परंतु मुंबई सरकारच्या को–ऑपरेटिव्ह खात्याच्या नव्या योजनेनुसार तालुका बँकिंग युनियन म्हणून काम करणेची सूचना व मान्यता सदर खात्याकडून येतांच त्यानें बँकेच्या सध्यांचे व्यवहारावर प्रतिकूल परिणाम होईल म्हणून ती सूचना ता. २८–५–५० च्या विशेष साधारण सभेंत नाकारून १०–९–५० च्या सभेंत बँकेचें नांव ' जमखंडी अर्बन को. बँक लि. ' असें ठेवून पुढील व्यवहार फक्त अर्बन स्वरूपाचेच करण्याबद्दल ठराव पास करणेंत आला आहे. तथापि मे. रजिस्ट्रारसाहेब यांनीं बनहट्टीची शाखा चालू ठेवण्यास परवानगी दिली आहे. सदरचे सभेंत मंजूर झालेले पोट कानू मे. रजिस्ट्रारसाहेब यांचे पसंतीसाठी पाठविण्यांत आले असून त्यांचे संमतीनें लवकरच ते अमलांत येतील. नवीन पोट कानूंच्या अंमलामुळें एक प्रकारें बँकेचा कायापालटच होणार आहे.

( चेअरमन : व्ही. एस. आनीखिंडी, लँडलॉर्ड अँड बँकर. मॅ. डॉयरेक्टर्स : १ एस. एम. अथणी, लँडलॉर्ड अँण्ड मर्चंट व २ आर. जी. दाते, बी.ए. एलएल. बी., मॅनेजर : एम. डी. खाडीलकर)

### २६ जानेवारी रोजीं पगारी सुटी

२६ जानेवारी रोजीं प्रजासत्ताक दिनानिमित्त सर्व कारखान्यांनीं आपल्या कामगारांना पगारी सुट्टी द्यावी, अशी भारत सरकारची सूचना आहे.

### अमेरिकेंतील पदवीधर

अमेरिकेंतील विद्यापीठांतून सुमारें ५,००,००० विद्यार्थी १९४९–५० मध्यें पदवी घेऊन बाहेर पडले. ही संख्या १९४८–४९ मधील संख्येपेक्षा १८% जास्त असून युद्धापूर्वीच्या संख्येपेक्षा १३०% जास्त आहे.

**उत्पादनाच्या विविध अंगांच्या हार्दिक सहकार्याची आवश्यकता**

"कारखान्यांची प्रगति व त्यांची कार्यक्षमता गुंतविणारा वर्ग, चालक, कामगार आणि सरकार ह्यांचे संबंध सलोख्याचे राहाण्यावरच अवलंबून आहे. सध्याच्या कठीण परिस्थितीचे काळांत तर आपल्या उद्योगधंद्यांचें अस्तित्वच अशा सहकार्यावर अवलंबून रहाणें स्वाभाविक आहे. कारखानदार व व्यापारी वर्गावर कांहीं वेळा जी प्रतिकूल टीका केली जाते, ती आमच्या कारखान्यांतील परिस्थितीस मात्र मुळींच लागू पडणारी नाहीं. १९४९–५० मधील मजुरीच्या २५% इतका बोनस ह्या वर्षी दरसालप्रमाणें कामगारांना मिळणार आहे. दूरच्या ठिकाणाहून कामासाठी येणाऱ्या कामगारांच्या सोयीसाठीं एक प्रशस्त विश्रांतिस्थान बांधण्याचें कंपनीनें योजिलें असून त्याकरितां ८०,००० रुपये बाजूस काढून ठेवले आहेत. प्रत्यक्ष रोजगारास लागण्यापूर्वी कामगारांना काम शिकविण्याच्या योजनांसाठी ३०,००० रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. किर्लोस्कर वाडींत रहाणाऱ्या किंवा तेथील शाळेंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण देण्याची योजना आखली ज्ञात आहे. कामगारांमध्यें सहकारी उत्पादक वृत्तीची जोपासना करण्यासाठीं आर्थिक व इतर सहाय्य देण्याचा बोर्डाचा विचार आहे. कामगारांच्या मुलांच्या उच्च शिक्षणासहि कंपनी मदत करील.

"संप करण्यापासून आपलें हित होत नाहीं, हें कामगारांना आतां कळून चुकलें आहे. कंपनी व तिचे कामगार ह्यांचेमधील तंटा ट्रायब्यूनलपुढें २२ जानेवारी रोजीं येईल. त्याचा निवाडा कांहींहि होवो, हें सत्य आहे कीं कंपनीची पुढील प्रगति आणि कामगारांचें अंतिम हित, हीं कारखान्यांच्या मूलग्राही मजबुतीवरच आणि उत्पादनाच्या अंगांच्या परस्पर सहकार्यावरच अवलंबून आहेत."

(किर्लोस्कर बंधु लि. च्या ३० व्या वार्षिक सभेंत अध्यक्ष, रावबहादुर जी. जी. डोंबेकर ह्यांचें भाषण)

---

**बँक अवार्डचा परिणाम**

बँक अवार्डचा मोठ्या बँकांवरील परिणाम त्यांच्या १९४९ च्या हिशेब पत्रकावरच झालेला दिसून येईल असें समजतें. इंपिरियल बँकेला नोकरांच्या पगारासाठीं ५० लक्ष रु. जास्त लागले असून सेंट्रल बँकेचा त्यावरील खर्च २० लाखांनीं वाढला आहे, असें समजतें. सेंट्रल बँकेनें २४ शाखा बंद करण्याची नोटीस अगोदरच देऊन टाकलेली आहे.

**देना बँकेचा नफा**

देवकरण नानजी बँकिंग कं. लि. ला १९४९ सालीं ७,१२,१३८ रु. नफा झाला. गेल्या वर्षीचा नफा ४,८४,११३ रु. होता.

**पार्लमेंटचें अधिवेशन**

भारतीय पार्लमेंटची तिसरी बैठक ५ फेब्रुवारी रोजीं सुरू होऊन ती २० एप्रिल अखेर चालेल.

**बँक ऑफ इंडियाचा नफा**

बँक ऑफ इंडियाला १९४९ सालीं ७५,०३,६७८ रु. नफा झाला. सबंध वर्षासाठी १४% करमाफ डिव्हिडंड मिळेल.


(मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित)

**दि मिरज स्टेट बँक लि.**

**—मिरज—**

शेड्यूल्ड बँक

(स्थापना : १९२९)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर (जि. धारवाड)

★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज (पे ऑफिस)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेंचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जात. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन. के. डी. शिराळकर, मॅनेजर



फोनः ३४५१९ तारः SAHYOG

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

**उत्पादकांच्या (प्रोड्यूसर्स) सोसायट्यांना**

असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन. टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करते:—

हातमागावरील कापड (सुती व लोकरी), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.


हे पत्र पुणें, पेठ भावुडां घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ९२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.